MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in /mercindia@mercindia.org.in
वेबसाईट : www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. १५/२०१६-१७

## जाहीर सूचना

### प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) (दुसरी सुधारणा) विनियम, २०१७ आणि प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी)(दुसरी सुधारणा) विनियम, २०१७ वर अभिप्राय मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ आणि मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ दि. १० जून, २००४ रोजी अधिसूचित केले असून त्यानंतर सदर विनियमांमध्ये दि. २१ डिसेंबर, २००६ रोजी सुधारणा करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने सन २००९ च्या दिवाणी अपील क्र. ३४५७-३४५८ मध्ये दिलेल्या निकालाच्या संदर्भात, विनियमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यानुसार, आयोग, महाराष्ट्रातील राज्यांतर्गत वीज व्यापार परवाना आणि पारेषण परवान्याच्या मंजूरीसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदारांच्या पात्रतेच्या अटी/अपात्रता या संबंधातील विनियम ४-अ च्या स्पष्टीकरणामधील प्रलंबित न्यायालयीन खटले हे शब्द वगळण्याची सुधारणा करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

या प्रस्तावित सुधारणांची प्रारुपे, आयोगाच्या **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** या संकेतस्थळांवरुन उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत. या प्रारुप सुधारणांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती ६(१+५) प्रतींमध्ये मागविण्यात येत असून त्या **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५** यांना व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६ किंवा **mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in** या ई-मेल द्वारा **दि. ३१ मार्च, २०१७** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने कृपया पाठवाव्यात. त्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व प्रतिक्रिया आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**दिनांक : २ मार्च, २०१७**
**ठिकाण : मुंबई**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**